# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक २०-१०-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक २० ऑक्टोबर-२०१५ रोजी (का.प.क्र.०८) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-१० वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री. खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री. जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ. रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री. सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ. स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स. श्री. खान अय्युब म.हुसेन खान
१६. स.स. श्री. शेजवळ सुभाष सयाजी
१७. स.स. श्री. रावसाहेब राधाकिसन आमले
१८. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१९. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२०. स.स. श्री. अफसर खॉन यासीन खॉ
२१. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२२. स.स. श्री. सय्यद मतीन रशीद
२३. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२४. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२५. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२६. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२७. स.स. श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

२८. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२९. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३०. स.स. सौ. शोभा नारायणराव वळसे
३१. स.स. श्री. चित्ते नितीन रमन
३२. स.स. सौ. ज्योती सुभाष पिंजरकर
३३. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३४. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३५. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३६. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३७. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३८. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३९. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
४०. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४१. स.स. श्री. मकरंद माधवराव कुलकर्णी
४२. स.स. श्री. खान इरशाद इब्राहिम
४३. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४४. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४५. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४६. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४७. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४८. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४९. स.स. श्री. तनवाणी राजु लेखराज
५०. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
५१. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
५२. स.स. श्री. एडके विकास प्रकाश
५३. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५४. स.स. श्री. भादवे रामेश्वर बाबुराव
५५. स.स. श्री. बल्लाळ मनोज आसाराम
५६. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५७. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५८. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
५९. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
६०. स.स. श्री. शेख जफर अखतर
६१. स.स. श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
६२. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६३. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६४. स.स. श्री. दांडगे शिवाजी भाऊसाहेब

इति.स.सा.सभा दिनांक २०.१०.२०१५
कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०८

६५. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६६. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६७. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
६८. स.स. श्री. खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६९. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
७०. स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
७१. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
७२. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
७३. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७४. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७५. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७६. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७७. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७८. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७९. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
८०. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
८१. स.स. श्री. जगताप भाऊसाहेब उत्तमराव
८२. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
८३. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
८४. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८५. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८६. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८७. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८८. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८९. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
९०. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
९१. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
९२. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
९३. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९४. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९५. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९६. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९७. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९८. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९९. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
१००. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
१०१. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद

१०२. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
१०३. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
१०४. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
१०५. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
१०६. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०७. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.विकास एडके :दादरीमध्ये श्री.मोहमद अकलाद अहेमद यांना मारण्यात आले या शहीदास श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.अफसर खान :यास अनुमोदन आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :लोकमत टाईम्सचे पत्रकार श्री.सुधीर पेडगावकर यांचा मुलगा समीर पेडगावकर यांचा भिषण अपघातात मृत्यू झाला श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजलीस उभे रहावे.

(यावेळी मोहम्मद अकलाद अहेमद व समीर पेडगावकर यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.अफसर खान :सभेला अधिकारी उपस्थित राहणे आवश्यक आहे असे आपण यापुर्वी आदेशीत केले आज एकही अधिकारी उपस्थित नाही त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे.

मा.महापौर :आयुक्त यांनी खुलासा करावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :अधिकारी सभेला उपस्थित नाही.सदस्य सभागृहात वेगवेगळे प्रश्न विचारून अधिकारी यांना त्रास देतात ब्लॅकमेल करतात अशा पेपरला बातम्या आल्या. आम्ही वैयक्तिक काम अधिकारी यांना सांगत नाही.अधिकारी पगार घेतात. या संस्थेचे ट्रस्टी म्हणून सदस्यांच्या सुचनेनुसार त्यांनी काम करणे आवश्यक आहे. सर्व अधिकारी उपस्थित राहण्या बाबत प्रशासनाला सुचना कराव्या.

श्री.जहागींर खान :एकही अधिकारी उपस्थित नाही.खुलासा घ्यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :चुकीचा संदेश अधिकारी देतात निषेदार्थ आहे अधिकारी संघटनेचे पदाधिकारी यांना बोलवून घ्यावे. एखादा अधिकारी दोषी असेल असे सभागृहाचे मत झाले व त्यांचे विरोधी सभागृह असेल त्यांचे समर्थन करण्यासाठी अधिकारी जात असेल तर चुकीचे आहे.

श्री.भगवान घडमोडे : सभागृहात चांगली वागणूक मिळत नाही असे अधिकारी सांगतात. परंतु कुणी सदस्य वैयक्तिक भांडणासाठी येत नाही. अधिकारी पगार घेतात आम्ही संस्थेचे ट्रस्टी आहोत जनतेने आम्हाला निवडुण दिले या संस्थेचे हित जोपासणे आमचे व अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. कर्तव्यात जर अधिकारी कसूर करीत असेल त्या विषयी जाब विचारला तर वाईट वाटण्याचे कारण नाही. समज दयावी. ऐकत नसेल तर कठोर कार्यवाही करण्याची तयारी ठेवावी आम्ही आपल्या पाठीशी आहोत.

श्री.राजगौरव वानखेडे :चांगले काम करणारे अधिकारी यांचे या सभागृहाने अभिनंदन केले. दबाव टाकतात असे म्हणणे चुकीचे होईल काम होत नसेल तर आम्ही प्रश्न,जाब विचारायचे नाही का? आज कोणत्या नियमानुसार अधिकारी उपस्थित नाही.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :अधिकारी यांना वैयक्तिक काम सांगत नाही. विकासाचे काम सांगतो अधिकारी अनुपस्थित राहून अंदोलन स्वरूप देणार असेल तर कामे होणार नाही त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :वार्डात कामे न केल्यास सदस्यांना जनता विचारते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४४ प्रमाणे सदस्य म्हणून आम्हाला अधिकार दिले त्याचा अपमान अधिकरी करीत असेल तर कार्यवाही करावी खुलासा घ्यावा.

श्री.शेख अब्दुल ताहेर :नागरी सेवा व शासकीय सेवा जे की नोकर कोण व मालक कोण त्यांचे कर्तव्य काय हे अधिकारी यांना समजत नसेल तर समज दयावी.

श्री.कैलास गायकवाड :आयुक्ताच्या संदर्भात प्रस्ताव आणला म्हणुन अधिकारी संघटनेने पत्र देऊन कळविले व अनुपस्थित आहे. सदस्यांच्या अधिकारावर गदा आणत असेल तर योग्य नाही. सभा कशी चालवायची व कोणता प्रस्ताव आणावा व आणू नये हे आमचे अधिकार आहे.

मा.महापौर :अति.आयुक्त यांनी खुलासा करावा.

अति.आयुक्त :अधिकारी संघटनेने निवेदन दिले वृत्तपत्राच्या माध्यमातून सर्वांनाच माहित आहे. मा.आयुक्त हे मुंबई येथे एका बैठकीला गेले मला सभागृहात उपस्थित राहण्याच्या सुचना मिळाल्या नुसार मी उपस्थित आहे. स्मार्ट सिटी कडे वाटचाल करीत आहोत. अधिकारी स.पदाधिकारी यांचे संबध एकोप्याचे असावे. संघटनेचे अध्यक्ष याचेंशी चर्चा केली व सभागृहात येण्याचे सांगितले सभागृहा बाहेर अधिकारी आहे त्यांना समजावून बोलविण्याचा प्रयत्न केला परंतु सभागृहात येणार नाही अशी भुमिका त्यांनी मांडली.

मा.महापौर :आयुक्त म्हणून अति.आयुक्त सभागृहात आहे. सभेचे कामकाज सुरू करू.

श्री.अफसर खान :आमच्या प्रश्नाचा खुलासा अति.आयुक्त करणार का? एकही अधिकारी येथे नाही काय कार्यवाही करणार आहे.

मा.महापौर :अति.आयुक्त उपस्थित आहे सर्व प्रश्नाच्या,प्रस्तावाच्या संदर्भाने ते माहिती देतिल. कायदयात काय तरतूद आहे माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अति.आयुक्त यांनी अधिकारी यांना सभागृहात बोलवावे. त्यांचे विरूध्द काय कार्यवाही करावयाची आम्ही सक्षम आहोत.

श्री.नासेर सिद्दीकी :अधिकारी उपस्थित नाही कामकाज होऊ नये.

श्री.अफसर खान :अतिक्रमण विभागात ८० दिवसापुर्वी पत्र दिले का कार्यवाही केली नाही.

श्री.भगवान घडमोडे :अधिकारी त्यांचे कर्तव्यात आहेत का नसेल तर कार्यवाही करावी.

मा.महापौर :अधिकारी संघटनेने विभागीय आयुक्तांना एक निवेदन दिले त्याची प्रत मला दिली.(वाचून दाखवितात.)सदस्यांनाही प्रत दिली जाईल. या पत्रात असे म्हटले की अधिकारी यांना आवश्यक असेल तरच सभागृहात पाचारण केले पाहिजे परंतु सर्व अधिकारी यांना सभेत हजर रहावे लागते.असे म्हटले.माझ्या मते स.सदस्यांना उत्तर मिळत नाही म्हणून सदस्य प्रश्न टाकतात.त्याचे उत्तर देणे बंधनकारक असल्याने अशा प्रकारे अधिकारी यांनी पळवाट काढणे,चुका झाल्यास गृहीत धरू नये.चुका माफ कराव्या असे म्हणणे असेल तर आपण सर्व याशी सहमत नाही.निवेदनात असे म्हटले की सार्वजनिक हिताचे निर्णय होत नाही पेपरच्या बातम्याच्या आधारे खोटे आरोप होतात.सभागृहात गोंधळ होतो ४५ मिनिटे प्रश्नावर चर्चा होणे अपेक्षीत आहे .परंतु या सभागृहात चांगल्या विषयावर चर्चा होऊन निर्णय होत असेल तर वाईट नाही.कामकाज कसे व किती वेळ चालवायचे हे अधिकारी यांनी आम्हाला सागंण्याची गरज नाही .यात टिंगल टवाळी करणारे व्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिक्षेप करणारे शेकडो प्रश्न लक्ष करून विचारले जातात असे म्हटले अधिकारी संघटनेने असे पत्र देऊन त्यानुसार सभागृहाचा अवमान होत असेल तर कठोर निर्णय सभागृहाला घ्यावा लागेल.

श्री.अफसर खान :कठोर निर्णय घ्यावा. असे शब्द वापरत असेल तर योग्य नाही संघटनेचे अध्यक्ष यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :मानहाणी दावा करावा. अधिकारी यांचे निवेदनात भाषा व्यवस्थित नाही ही बोलण्याची पध्दत बरोबर नाही. सर्वांवर कार्यवाही करावी.

श्री.जहागींर खान :सभागृहाचा हा अपमान आहे. कार्यवाही करावी. त्यांचे कामाची मालमत्तेची चौकशी करावी.

श्री.राजू शिंदे :अधिकारी यांनी निवेदन दिले. त्यात जे शब्द वापरले हा सभागृहाचा अपमान आहे. जे अधिकारी होऊ शकत नव्हते त्यांना प्रमोशन दिले, त्यांचे शब्द त्यांनी परत घ्यावे माफी मागावी,तरच सभागृहात येऊ दयावे. कोणत्या नियमाने ते अनुपस्थित आहे ते सांगावे किती वेळ सभा चालवायची हा आमचा अधिकार आहे. या अधिका-या बरोबर शासनाचे अधिकारी सुध्दा सामिल झाले. त्यांचेवरही कार्यवाही करावी. असे पत्र अधिकारी यांना देता येते का विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :निवेदन दिले त्यावर कुणाचे नाव नाही. जो ठराव मांडला त्या विषयी दुफळी निर्माण व्हावी,गैरसमज व्हावे म्हणून निवेदन दिले. सभेचे कामकाज सुरू करावे आयुक्ताच्या बाबतीत जो ठराव ठेवला त्यावर चर्चा करावी.

श्री.गजानन बारवाल :अधिकारी संघटनेने मा.विभागीय आयुक्त यांना निवेदन दिले. ते पत्र मी फाडत आहे. आयुक्तांचा विषय चर्चेला घ्यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :आयुक्ताचा विषय अगोदर घ्यावा.

मा.उपमहापौर :भारत व राज्य सरकारच्या नियमाप्रमाणे खासदार आमदार इतर सर्व लोकप्रतिनिधी यांना सर्वांना मालमत्तेची माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच अधिकारी यांना सुध्दा बंधनकारक आहे हीच माहिती मी विचारली आहे यात वाइट काहीही नाही. प्रश्नोत्तराची चांगली पध्दत मा.महापौर यांनी सुरू केली यामुळे उत्तरे मिळत आहे. नगररचना, अग्निशमन तसेच अतिक्रमणाचे प्रश्न मांडले ते विचारू नये असे त्यांचे मत असेल. तर योग्य नाही जे पत्र दिले ते चुकीचे आहे. योग्य ठोस निर्णय या बाबतीत घ्यावा.

मा.महापौर :इतिवृत्ताचा विषय आहे तो अगोदर घेऊ.

**विषय क्रमांक १७८:-**

सोमवार दिनांक २०.०७.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०५) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.राजेंद्र जंजाळ :दुरूस्तीसह मंजूर करावे.

मा.महापौर :हा विषय दुरूस्तीसह मंजूर

**ठराव :**

सोमवार दिनांक २०.०७.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०५) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**संवाद :**

श्री.राजेंद्र जंजाळ :विषय क्रमांक-२१८ अगोदर घेण्यात यावा. त्यावर चर्चा करावी.

श्री.गजानन बारवाल :मा.आयुक्तांच्या बाबतीतला विषय अगोदर घेण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रश्नोत्तराच्या अगोदर आयुक्तांच्या बाबतीतला विषय घ्यावा.

श्री.भगवान घडमोडे :मा.आयुक्तांच्या बाबतीतला विषय अगोदर घ्यावा.

**विषय क्रमांक २१८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराचा स्मार्ट सिटी योजनेत समावेश व्हावा या दृष्टीकोनातून महानगरपालिकेतर्फे विशेष प्रयत्न सुरु करण्यात येत आहेत.महानगरपालिकेचा या योजनेत समावेश व्हावा यासाठी सर्व स.पदाधिकारी तसेच स.सदस्य प्रयत्न करीत असतांना मा.आयुक्त महोदय कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नसल्याचे सर्व स.सदस्यांच्या निदर्शनास आले आहे. खालील मुद्यांबाबत विचार केल्यास ही बाब प्रकर्षाने निदर्शनास येते.

१. औरंगाबाद महानगरपालिकेच्या आयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यानंतर आयुक्तांनी शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून कोणताही निर्णय घेतलेला नसुन सर्वच विभागाचा

कारभार अत्यंत धिम्यागतीने करण्यात येत असल्याने महानगरपालिकेच्या अर्थिक परिस्थितीत कोणत्याही प्रकारची सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही.

२. स्मार्ट सिटी साठी रक्कम रुपये ५०.०० कोटी जमा करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला तथापि सदरील रक्कम उभारण्यासाठी कोणत्याही प्रकारचे विशेष प्रयत्न मा.आयुक्त करीत नसल्यामुळे अद्यापही सदर रक्कम जमा करणे महापालिकेला शक्य झालेले नाही.

३. मालमत्ता कर वसुली व इतर वसुलीच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसुन येते मालमत्ता कर वसुलीसाठी कोणतेही विशेष अभियान/योजना राबविण्यात आलेली नाही..स.सदस्यांच्या प्रभागातील कोणत्याही विकास कामांना मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली नाही.

४. शासन निर्णयाप्रमाणे मा.आयुक्त स.सदस्यांना तसेच नागरीकांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी निश्चित वेळ उपलब्ध करुन देत नाहीत व भेटत देखिल नाहीत.

५. जे स.सदस्य त्यांची भेट घेण्यासाठी दालनात जातात त्यांच्याशी त्यांची वर्तणूक उद्दामपणाची व बेजबाबदारपणाची असल्याने स.सदस्यांची त्यांच्याशी वादावादी झालेली आहे.

६. नगर रचना,मालमत्ता विभाग तसेच मालमत्ता कराच्या संचिका बऱ्याच दिवसांपासून प्रलंबीत आहेत त्या निकाली काढून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न आयुक्त करीत असल्याचे दिसून येत नाही.

७. मा.पालकमंत्री महोदयांनी शहरात राबविलेल्या स्वच्छता अभियांनात सर्व पदाधिकारी, नगरसेवक तसेच शहरातील नागरीक प्रामाणिकपणे सहभागी होत असतांना महापालिका आयुक्तांचा कुठेच सहभाग दिसून आलेला नाही.तसेच बायो मेडीकल वेस्ट सारख्या प्रकरणात देखिल त्यांनी कोणत्याही प्रकारचे गांभीर्य दाखवले नाही व त्यावर कार्यवाही केलेली नाही.

८. मुद्रांक नोंदीनुसार मालमत्तांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मागवून मालमत्ता कर नोदणी व वसुली बाबत कोणत्याही प्रकारची ठोस कार्यवाही केलेली नाही.

९. कलम ६७ अ नुसार पर्यावरण समितीचा अहवाल दरवर्षी ३१ जुलै पर्यत सादर करणे आवश्यक असतांना सदरील अहवाल सादर करण्यास आयुक्त अपयशी ठरले.

१०. महानगरपालिका अस्थापनेवरील बरेच कर्मचारी या एक दोन वर्षात निवृत्त होणार असून देखिल त्या दृष्टीकोनातून पर्यायी व्यवस्थे बाबत कोणतेच नियोजन केलेले नाही.आकृतीबंध तयार करुन त्यास लवकरात लवकर मंजूरी आणण्याबाबत कार्यवाही करणे अत्यावश्यक असतांना काहीही निर्णय घेतलेला दिसून येत नाही.

११. शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असतांना कुत्र्यांची नसबंदी बाबतच्या संचिकेवर गेल्या सहा महिन्यापासून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही व संचिकाही निकाली काढली नाही.

१२. शहराच्या डी पी रोड बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण १४ नुसार वेळोवेळी सुचना देऊनही त्याबाबतचा फलक संबंधीत डी पी रोडवर लावणे बाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

१३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ४ अ मधील ६० अ /५ नुसार प्रत्येक तिमाही नंतर दोन महिन्याच्या आत त्या तिमाहीच्या लेखापरिक्षित ताळेबंद जमा व खर्च

आणि पैशाचा ओघ दर्शविणारे वित्तीय विवरणे पत्र माहिती प्रकट करणे बाबत काहीही कार्यवाही केलेली नाही त्यामुळे लेखाविभागाच्या कामकाजात बेजबाबदार पणा आल्याचे दिसून येते.

१४. स्थायी समितीच्या कोणत्याही सभेत मा.आयुक्त उपस्थित रहात नाहीत. मा.सभापती स्थायी समिती यांना कोणतीही पुर्व सुचना न देता गैरहजर राहतात.

१५. शहरातील निर्माण झालेल्या विविध समस्ये बाबत स्थळ पाहणी करावयाची असल्यास काय रोज रोज तेच ते पहायचे असे बेजबाबदार व्यक्तव्य ते करतात.

१६. मा.सर्व साधारण सभेने पारित केलेल्या ठरावावर आपण कोणतीही कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.पारित केलेले ठराव नियमबाहय असल्यास ते विखंडीत करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठविण्याची तरतुद आहे.तसे न करता मा.सर्व साधारण सभेने घेतलेल्या निर्णया विरोधात आपण व्यक्तव्य केलेले आहे व तसे पत्रही दिलेले आहे. सदरील बाब गंभीर असुन मा.सर्व साधारण सभेच्या निर्णयाचा अवमान करणारी आहे.

१७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट ४ मधील तरतुदी नुसार शहरातील मालमत्तांचे प्रत्येक ४ वर्षाला मालमत्ता कराचे पुनरावलोकन (रिव्हीजन)करण्याबाबत तरतुद असतांनाही आपण मालमत्ता कराची रिव्हीजन करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही ही गंभीर बाब आहे.

१८. मा.सर्वोच्च न्यायालय,मा.उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांनी प्लास्टीक कचरा हाताळणी अधिनियम २००२ मधील तरतुदी नुसार शहरातील ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक कॅरीबॅग वापरण्यावर बंदी घालणे तसेच लोकजागृती करणे, अशा प्रकारे लोकांवर ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक कॅरीबॅग चा वापर करणाऱ्यांवर खटले दाखल करणे / दंड लावणे अशा प्रकारे नियमाचे पालन आपण केलेले नाही ही बाब मा.सर्वोच्च न्यायालय,मा.उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिवाच्या आदेशाचा अवमान करणारी आहे.

१९. मा.सर्व साधारण सभेच्या सभागृहात प्रश्नांचे उत्तर देत असतांना आपण आमच्या अधिकाऱ्यांना इंग्रजी वाचता येत नाही अशा प्रकारचे बेजबाबदार व्यक्तव्य आपण केलेले आहे ही बाब राजपत्रीत अधिकाऱ्याच्या आचारसंहितेला न शोभणारी आहे.

२०. महानगरपालिकेतर्फे बीओटी तत्वावर देण्यात आलेल्या सगळयाच प्रकल्पामध्ये अनियमितता आढळून आलेली आहे,या बाबत वेळोवेळी वृत्तपत्रात छापून आलेले असतांनाही आपण कोणतीही कार्यवाही केलेली नाही तसेच राकाज्सारख्या प्रकरणामुळे महानगरपालिकेची बदनामी झालेली आहे याची सर्वस्वी जबाबदारी आपली आहे.

या सर्व बाबींवरुन मा.आयुक्तांनी त्यांच्या कर्तव्याचे पालन करण्यात कसुर केलेली असल्याचे स्पष्टपणे निदर्शनास आलेले असल्याने स.सदस्यांचा मा.आयुक्तांवरील विश्वासास तडा गेला आहे. मा.आयुक्त हे महराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३६/३ नुसार त्यांचे कर्तव्य पार पाडण्यात कसुर करीत असल्याचे निदर्शनास येत असल्याने मा.आयुक्त यांना शासनाकडे परत पाठविणे बाबतचा ठराव मा.सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे,श्री.गजानन रामकिसन बारवाल,

**अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात,श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत,

**संवाद :**

श्री.राजगौरव वानखेडे :प्रस्तावात २० मुद्दे दिले. त्यावर आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.अफसर खान :आयुक्ताचे स्मार्ट सिटी, शहराच्या विकासासाठी योगदान नाही असे म्हटले या बॉडीचा कार्यकाळ सुरू होऊन,महापौर होऊन सात महिणे झाले शिवसेना भाजपाची सत्ता आहे.काम करीत नाही तर आयुक्तांची बदली किंवा रजेवर का पाठविले नाही आजच हा ठराव आणण्याची आवश्यकता का वाटली.

श्री.सुभाष शेजवळ :मी आयुक्तांना २७ कोटीचा निधी संदर्भात प्रश्न केला तो निधी शासनाचा दलित वस्तीमध्ये शौचालय व नळ जोडणीसाठी होता त्यात आयुक्तांनी लक्ष दिले नाही शासनाला परत गेला ३० लक्ष वेळेवर भरले नाही भरले असते तर महानगरपालिकेस परत मिळाले असते. ७ महिन्यात चांगले काम केले नाही. १४ जानेवारी २०११ ला ही योजना आली तेंव्हापासून काम केले नाही. जो ठराव आहे तो योग्य आहे.

श्री.जहागीर खान मुलानी :नाला व भुमीगत गटार संदर्भात माहिती मागीतली दिली नाही.अधिकारी सभेला आले नाही त्यांना यापुढे येऊ देणार की नाही.

श्री.कैलास गायकवाड :यापुर्वीच हा प्रस्ताव यायला पाहिजे होता सव्वा वर्षापासून आयुक्त कार्यरत आहे. अनेक वेळा मी टॅक्स वाढविण्यासाठी ७-८ वेळेस पत्र दिले नवीन बॉडी आली तेंव्हाही पत्र दिले.उत्तर दिले नाही मागच्या बैठकीत टॅक्सचा विषय घेतला होता त्यावर बैठक लावणार होतो. २७ कोटीचा निधी संदर्भात मा.आयुक्तांना निवेदन केले होते की, जी रक्कम भरायची ती तात्काळ भरावी शहरासाठी पैसे मिळणार असे पत्र दिले. अशा अनेक योजना असतांत या योजनेचे काय? जे प्रश्न मांडला त्यावर आयुक्त गंभीर नव्हते. ७-८ महिण्यात जे निर्णय आपण घेतले त्यापैकी १० टक्के सुध्दा अंमलबजावणी केली नाही. प्रशासनाच्या ज्या बैठका रिसर्च सेंटरमध्ये होता त्या बंद कराव्यात शहरातील नागरीक कार्यालयात येतो त्यांना कुणीही भेटत नाही. राकाजचा गंभीर विषय चर्चेला आला तेथील सीसीटीव्ही फुटेज गायब झाले गंभीरतेने घेतले नाही. प्रतिनियुक्तीच्या अधिका-याचे प्रस्ताव सभेच्या मंजूरीसाठी ठेवले नाही नियमीत सभागृहाचा अवमान करायचे.हा प्रस्ताव मंजूर करावा

श्री.भाऊसाहेब जगताप :राज्यात युतीचे सरकार आहे. ही वेळ का आली शासनाकडे मागणी का केली नाही? हा ठराव पारीत करायचा असेल तर मतदान घेण्यात यावे.तसे निवेदन आपल्याकडे देतो.(यावेळी मा.महापौराकडे निवेदन देण्यात येते.)

श्री.गजानन बारवाल :गेल्या ७ महिण्यात आयुक्तांनी कोणत्याही वार्डात रस्त्याची ड्रेनेजची, नाल्याची पाहणी केली का?ते या बाबतीत दखल घेत नसे. प्रस्तावातील आरोप योग्य आहे. प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी

कोण? त्याचेकडे कोणते काम याची माहिती दिली नाही. प्रश्न महत्वाचे असतांना दौ-यावर जातात. श्री.नाईकवाडे, पशुसंवर्धन अधिकारी यांचे बरोबर आयुक्ताचे दौ-यावर जाण्याचे योग्य होते का? सभा असतांना ते उपस्थित का नाही? स्थायी समितीला उपस्थित नसतात. बजेट संदर्भात गंभीर नाही. पदाधिकारी यांचे बरोबर चर्चा करीत नाही. अतिरिक्त आयुक्त यांनी माहिती देऊन देखिल आयुक्त गंभीर नव्हते. कचरा साफसफाईची मोहिम हाती घेतली सर्वांनी काम केले आयुक्तांचा तितका सहभाग जाणवला नाही. पाणी, अतिक्रमण व रस्ता रूंदीकरणाची कामे पोलीस आयुक्तांना करावी लागतात. ती महानगरपालिकेसाठी लाजीरवाणी गोष्ट आहे. आयुक्त तेथे कधी गेले का? अनेक प्रश्न ते गंभीरतेने घेत नव्हते. प्रश्न केल्यास त्याचे उत्तर दिले नाही व अधिका-यांकडून आयुक्तांना घेता आले नाही. प्रशासनावर कोणताही अंकूश राहिला नाही. ते अधिकारी व इतरांना वेगळया प्रकाराची भाषा बोलतात. लेखा परीक्षण का केले नाही? पर्यावरणाच्या विषयात दखल घेतली नाही. प्रेसमार्फत अमुक गोष्टी करायला पाहिजे असे निदर्शनास आणून दिले तरी केले नाही. अनेक वेळा बैठका झाल्या तेथे आले नाही. जे आरोप यात दिले त्यांचे उत्तर प्रशासन देऊ शकते का? या प्रस्तावानुसार त्यांना परत शासनाकडे पाठवावे.

श्रीमती संगिता वाघुले :जे बोलले जाते ते बरोबर आहे ५ महिन्यात वार्डात पाहणी केली नाही मा.आयुक्तांनी व्यवस्थीत काम केले असते तर ही वेळ आली नसती. दलित वस्तीचा निधी परत गेला तो परत गेला नसता प्रशासनाच्या हातात होते.प्रत्येक सदस्यांचा अपमान केला आहे. प्रश्नाचे उत्तर त्यांचेकडे नाही. चुकी सुधारावी माफी मागावी.

श्री.अयुब जागीरदार :प्रत्येक कामात अपयशी आहेत व प्रत्येक वेळी आमचा अपमान केला व स.स.श्री.गंगाधर ढगे कामा निमित्ताने भेटायला गेले तर आयुक्तांनी दालना बाहेर काढले. वार्डात ते आले नाही. अनेक वेळा आम्ही त्यांचेकडे जाऊन वार्डातील समस्या बाबत पाहणी करण्याची विनंती केली. बैठकीला जायचे निमित्त करून आले नाही. शहराच्या कामासाठी पोलीस आयुक्तांना सहभाग घ्यावा लागला. मनपा आयुक्त कमजोर पडतात. जे अधिकारी मनमानी करतात कामात दिरंगाई करतात त्यांचे सर्वासाठी असाच निर्णय घ्यावा.

श्रीमती सिमा खरात :प्रस्तावातील क्र.१९ मध्ये म्हटल्याप्रमाणे आयुक्त सांगतात अधिकारी यांना इंग्रजी बोलता येत नाही. मुख्याध्यापक चांगले तर विदयार्थी चांगले.ज्यांना इंग्रजी वाचता येत नसेल तर आयुक्तांनी मुल्यमापन करावे तेच अधिकारी बाहेर बसले याचा अर्थ उलटा चोर कोतवालको दाटे अधिकारी उत्तरे देत नाही अयोग्य बाब आहे. सर्वानी इंग्लीश स्पिकींग कोर्स लावावे. आम्ही टाईमपास करण्यास येत नाही. नागरीक

आम्हाला हे विचारु शकतात. अधिकारी यांनी माफी मागावी. तरच सभागृहात येऊ दयावे.

श्री.भगवान घडमोडे :आयुक्तांनी त्यांचे कार्यकाळात किती तास बसले? फोन घेत नाही. सदस्य वैयक्तीक काम घेऊन येत नाही.वार्डाच्या समस्या घेवून येतात. त्या सुटत नसेल तर जाब विचारण्याचा अधिकार आम्हाला आहे. २० मुद्दे दिले त्यातील एकही काम केले नाही पाण्याचा विषय आला प्रशासन ठोस भुमिका घेत नाही. रस्त्याचा प्रश्न घेत नाही. दौरे करण्याचे काम केले. स्मार्ट सिटी साठी पैसे जमा करायचे होते वसुली वाढविली नाही, ५० कोटी जमा झाले नाही, चांगले काम केले नाही. त्यांना परत पाठवावे व शासनाच्या हितासाठी हा ठराव घेतो. शासन मनपाचा विकास करण्यास कटीबध्द आहे. असे अकार्यक्षम अधिकारी असेल तर त्यांचे बाबतीत असा निर्णय घेणे आवश्यक आहे. हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :सदस्य झाल्यापासून मी आयुक्तांना वेगवेगळया समस्यांबाबत ३२ पत्र दिले एकाही पत्राचे उत्तर नाही कार्यवाही केली नाही. ०५.०५.२०१५ ला बँक कॉलनी येथे खुल्या जागेवर कामे करून जागा विकसीत करावी व पाहणी करावी असे पत्र दिले होते. आयुक्त तेथे आले नाही. उन्हाळयात पाण्याची टंचाई निर्माण होते इंधन विहिरी घेण्याचे सुचविले,केले नाही. पाण्याचे बील वितरणा बाबत व्यवस्थित कार्यवाही करावी असे निर्देश दिले असतांना कार्यवाही होत नाही. रेन वॉटर हार्वेस्टीग व्हावे व करात २५ टक्के सुट द्यावी असा ठराव घेतला. त्याची अंमलबजावणी केली नाही, त्यामूळे हा प्रकल्प करण्यास अडचणी आल्या. मनपाचे हॉल, सभागृह रुपये १०००/- भाडे आकारून नागरीकांना, संस्थेला द्यावे असा ठराव घेतला. माझ्या वार्डात अलंकार व नंदीग्राम सोसायटीमध्ये सभागृह भाड्याने द्यावे. विनंती केली, भाड्याने दिले नाही. महसूल वाढविण्याचे काम आयुक्तांनी केले नाही. क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यास हिंदू-हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नाव दिलेले असतांना गुगल मॅपवर भापकर मार्ग असेच नांव दिसते. याची दुरूस्ती केली नाही. विजयनगर भागात १२ कुटूंबीयांना त्यांची चुक नसतांना घरे पाडली. त्यांची पर्यायी व्यवस्था करावी. सभेत मागणी केली निर्णय घेतला. त्यांना मोबदला व पर्यायी व्यवस्था केली नाही. आजही भुखंड खुला आहे. शिक्षण, आरोग्य असेल याकडे आयुक्तांनी दुर्लक्ष केले. मुकूंदवाडी शाळेत विद्यार्थी संख्या चांगली व तेथे सायन्स लॅब डेव्हलप करावा म्हणून संचिका ३ लक्षच्या खर्चासाठी पडून आहे. भुमीगत गटार संमातर वाहिनी संदर्भातील पीएमसी व पदाधिकारी यांचे सोबत बैठक घेऊन शंकेचे निरसन करायला पाहिजे ते काम आयुक्तांनी केले नाही. विशालनगर भागात मनपाची २० हजार स्क्वे.मीटर जागा आहे चार पोल लावून जागा

संरक्षीत करायची होती ते काम सुध्दा होत नाही. कालांतराने तेथे अतिक्रमण होईल. लक्ष देण्यास आयुक्तांना वेळ नाही. नगररचना विभागाच्या मार्फत चुकीच्या परवानगी दिल्या जातात. कुंभारवाडा येथे बांधकाम परवानगी दिली टीडीआर धरून मोजली तरी त्यापेक्षा कमीत कमी ३० हजार स्क्वे.फुटची त्या बांधकामात अफरातफर झाली. युजमध्ये २५ टक्के कमर्शियल व निवासी मध्ये ७५ टक्के दाखविले होते. त्या बाबतीत नियोजन नाही. मनपाचा मनमानी पध्दतीने कारभार चालतो. कमर्शियल ७५ व निवासी २५ टक्के वापर तेथे होतो. या बाबतीत आयुक्तांनी कार्यवाही केली नाही. एनयुएलएम योजनेनुसार दारिद्रय रेषेखालील लोकांचे सर्वेक्षण करावे पत्र दिले केले नाही. या बाबतीत रिट पिटीशन करण्यात येत आहे. आयुक्त काही करीत नाही म्हणून मा.पोलीस आयुक्तांना अतिक्रमणाच्या बाबतीत लक्ष घालावे लागले. ज्या सुचना दिल्या त्याची यादी करून राज्य शासनाकडे पाठवावे. जे निर्णय घेतलेले पायदळी तुडवण्याचे काम प्रशासनाने केले. हे शासनाच्या लक्षात येईल. आयुक्त चांगले बोलत नाही संसदीय भाषा वापरत नाही असे अधिकारी यापुर्वी सांगत होते. आज आयुक्ताच्या पाठीमागे कसे गेले. संघटनेचे पदाधिकारी यांचे दबावाने तुमच्यावर कार्यवाही करू असे त्यांना सांगण्यात आले असेल. श्री.झनझन यांचे बाबतीत अनेकदा चौकशीची मागणी झाली अधिकारी यांनी केलेल्या चुका बाजूला सारून चुकांवर पांघरुण घालण्याच्या दृष्टीने संघटना अध्यक्ष काम करीत आहे. राकाज् प्रकरणात सीसीटीव्ही चे फुटेज गायब झाले. पुढे कार्यवाही नाही २७ कोटी अर्थसहाय्य येण्यासाठी रक्कम भरणा करण्यास उशीर झाला. आयुक्त कार्यालयात न बसणे, फोन न उचलणे, सदस्यांशी हुज्जत घालणे, अशा अनेक तक्रारी आहे. मा.आयुक्तांनी आर्थीक हित जोपासले नाही. संस्थेला वेळ दिला नाही अधिका-यांना सोबत घेवून काम केले नाही. शिवसेनेचा गटनेता म्हणून सर्व सदस्यांचा या प्रस्तावास पाठींबा आहे. त्या संबंधीचे सहयांचे पत्र देत आहे. (यावेळी स.स.श्री.रेणूकादास वैद्य हे मा.महापौरांना पत्र देतात).

श्री.अब्दुल र. नाईकवाडी :मा.महापौर आपणाकडे आलो होतो. आमच्या सदस्यांबरोबर चांगली वागणूक त्यांनी दिली नाही

मा.महापौर :तो प्रस्ताव आजही आहे. विधी विभागाचा सल्ला घेतला त्यावेळीही आम्ही आपल्या बरोबर होतो.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :त्यावेळी कार्यवाही झाली असती तर अधिकारी बाहेर नसते. स.स.श्री.ढगे व श्री.जमीर कादरी यांचे बरोबर वाद केला होता. पहिला प्रस्ताव एमआयएमने सादर केला होता. जो निर्णय पक्षश्रेष्ठी घेतील त्यानुसार आम्ही मागे राहू.

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :शहर विकास आघाडीच्या तर्फे सर्वांच्या सह्यांचे या ठरावास समर्थन असल्याचे निवेदन आपल्याकडे देत आहे. (यावेळी श्री.गजानन बारवाल हे मा.महापौरांना निवेदन देतात.) |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :मा.आयुक्त हे सदस्यांबरोबर कसे बोलत होते? कशी वागणूक देत होत? त्याची व्हिडीओ क्लिप दाखविण्याची परवानगी द्यावी. |
| श्री.दिलीप थोरात | :अनुपस्थित रजेची परवानगी स्थायी समितीकडून मा.आयुक्तांनी कधीच घेतली नाही. स्थायी समितीच्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. सदस्यांनी मांडलेल्या भुमिकेचे समर्थन करतो. सभागृहाने एकमताने हा ठराव मंजूर करावा. सर्वांनी समर्थन करावे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :७ महिन्यात विषय मंजूर केले. कितीवर अंमलबजावणी केली प्रमोशनचे विषय अंमलबजावणी लवकर होते. विकास कामासाठी विशिष्ट अधिकाऱ्यांकडे विनंती करून संचिकेवर सही आणावी. असे आम्हाला सांगावे लागते.सदस्य संचिका घेऊन गेल्यास नगरसेवकांचा यात इन्ट्रेस आहे का अशी शंका मा.आयुक्त घेत असे.नगररचना मालमत्ता विभागासंदर्भात माहिती विचारली ती दिली जात नाही ठरावास समर्थन आहे. शासनाकडे पाठवावे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :सभेच्या सुरूवातीला अधिकारी यांनी निवेदन दिले की सभेला येणार नाही. अधिकारी यांचे मालमत्ता विवरण जाहिर करण्याची मागणीशासन निर्णयानुसार उपमहापौर यांनी केली होती दरवर्षी ती जाहीर केली पाहिजे. किती वेळेस जाहीर करून घेतली तसेच शासनाने जे निर्देश दिले त्यांची अंमलबजावणी आयुक्तांनी केली नाही. गुंठेवारीमध्ये पाणी व ड्रेनेज लाईन टाकण्याचा ठराव घेतला त्यानुसार काम सुरू केले नाही. उलट कंपनीला पत्र दिले की गुंठेवारीत काम करता येणार नाही. यामूळे सभागृहाने घेतलेल्या ठरावाचा अपमान केला. शासनाचे मुख्य सचिव श्री.रत्नाकर गायकवाड यांनी प्लास्टीक कचरा हाताळणी संदर्भात आयुक्तांना पत्र दिले. प्लास्टीकच्या वापरा बाबत नियमावली करून ती जाहीर करावी. जे वापरत असतील त्याचेवर गुन्हे दाखल करावे दंड लावावा या बाबत प्रश्न केला होता उत्तर मिळाले नाही शासनाच्या आदेशाची मा.आयुक्तांनी पायमल्ली केली आहे.उत्तर देतांना सांगितले की अधिका-यांना इंग्रजी येत नाही राहून गेले असेल. याची दखल आयुक्तांनी घेतली नाही तसेच महाराष्ट्र राज्यातील मनपातील वर्गीकरण आणि सेवेतील विभागाचा आकृतीबंद बाबत जीआर आला होता त्यात प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांची तांत्रिक व लेखा सेवेतील पदासाठी किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिका-यांची प्रशासकीय सेवेच्या पदावर बदली व प्रतिनियुक्ती करता येणार नाही. परंतु आयुक्तांनी टेक्नीकल यांना प्रशासकीय पद दिले प्रशासकीय यांना टेक्नीकल पदावर नेमले ऑडीटवर जे आहे त्यांना अतिक्रमणामध्ये टाकले. शासन |

निर्णयाचा अवमान केला स्मार्ट सिटीसाठी ५० कोटी हिस्सा शासनाकडे दयायचे होते हे करण्यासाठी कर वसुलीचा पदभार बदलावा. निर्णय घेतला तो पदभार आयुक्तांनी स्वत:कडे घेतला. कनिष्ठ दर्जाचा अधिका-यांचा पदभार वरिष्ठ अधिका-यांना देता येत नाही. शासन जीआर आहे. अतिरिक्त पदभार ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी साठी ठेवता येत नाही. त्याची प्रत आहे. तसेच २७ कोटी निधी परत जाण्याचा किंवा टॅक्स वसुलीचा विषय असेल गंभीरतेने घेतले नाही, पर्यावरण सद्यस्थिती अहवाल असेल तीन वर्षापासून कार्यवाही केली नाही. बायोमेडीकल वेस्ट बाबत आम्ही सदस्यांनी व्हिजीट दिली काम तेथे व्यवस्थीत नाही. पत्र देऊनही आयुक्तांनी कार्यवाही केली नाही. प्रकरण ६ मध्ये जी कर्तव्ये दिली, त्यातील एकही कर्तव्य केले नाही. कुत्रे चावल्यानंतर लस दिली जात नाही. या सर्व बाबींनुसार आयुक्त हे प्रशासन चालविण्यास असमर्थ व अकार्यक्षम आहे. त्यामूळे त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

मा.महापौर :या प्रस्तावाच्या संदर्भाने मला देण्यात आलेल्या निवेदनात १२ सदस्यांनी मतदानाची मागणी केली आहे. मागणी केल्यानुसार मतदान घेण्यात यावे. नगर सचिव यांनी यासंदर्भात कार्यपध्दती सांगावी.

नगर सचिव :आजच्या सर्वसाधारण सभेतील पुरवणी विषय पत्रिकेवरील विषय क्रमांक २१८ हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुचि 'ड' चे प्रकरण-२ आणि नियम-१(ज) अन्वये पुरवणी विषय पत्रिकेवर घेण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूचि-ड प्रकरण-२ प्रमाणे महानगरपालिकेचे कामकाजाबाबत असलेल्या नियमातील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

नियम १(प): एखादा प्रस्ताव पारित झाला आहे अशी अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने केलेली घोषणा आणि कार्यवृत्त पुस्तकात तशा अर्थाची केलेली नोंद ही अशा घोषणेच्या वेळी कमीत कमी चार पालिका सदस्यांनी मतदानाची मागणी केली नाही तर, त्या वस्तुस्थितीचा निर्णायक पुरावा असेल; मग अशा प्रस्तावाच्या बाजूने किंवा प्रस्तावाच्या विरुध्द देण्यात आलेल्या मतांची संख्या सिध्द करण्याची आवश्यकता असणार नाही.

नियम क्र.१(क्यु): मतदान घेण्यात येईल तेंव्हा अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने नेमलेल्या गणकांनी उपस्थित असलेल्या व प्रस्तावावर मतदान करणाऱ्या प्रत्येक पालिका सदस्याचे मत घेतले पाहिजे आणि अनुक्रमे प्रस्तावाच्या बाजूने किंवा प्रस्तावाच्या विरुध्द मतदान करणाऱ्या पालिका सदस्यांची नावे कार्यवृत्त पुस्तकात लिहिण्यात आली पाहिजे.

नियम क्र.३५: लेखी मतमोजणी कशी घ्यावी आणि गणकाची कर्तव्ये.

ज्यावेळी लेखी मतमोजणी करण्यात येईल त्यावेळी सभापती प्रस्तावाला अनुकूल असतील त्याचा आणि प्रतिकुल असतील त्याचा असे दोन गट करण्यास सांगतील.

सभागृहाच्या टोकाला असलेल्या दोन कोपऱ्यात दोन मेजे कायमची ठेवण्यात यावीत.लेखी मतमोजणीची मागणी करण्यात आल्याबरोबर नगरसचिव यांनी प्रत्येक मेजावर सभासदांची यादी ठेवावी. सभासदांनी तेथे जावून आपआपल्या नावापुढे सभापतींनी नेमलेल्या गणकासमक्ष आपल्या नावांची आद्याक्षरे करावीत. मेजावर “होय” आणि “नाही” या लिखाणाचे फलक लावण्यात येतील. उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या प्रत्येक सभासदाचे मत गणक वर सांगितल्याप्रमाणे घेतील आणि प्रस्तावाला अनुकूल वा प्रतिकुल असलेल्या सभासदानी त्याप्रमाणे तटस्थ राहणाऱ्या सभासदाची नावे वृत्तांत पुस्तिकेत नोंदली जातील.नामनिर्देशित पालिका सदस्यांना मतदानात भाग घेता येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी. मा.पिठासीन अधिकारी यांना विनंती की, त्यांनी एक “होय” व दुसरे “नाही” असे लिहिलेल्या टेबलाजवळ दोन गणकांची नियुक्ती केल्याप्रमाणे मत मोजणीसाठी श्री.एच.आर.बाहेती,आयुक्तांचे स्विय सहाय्यक व डॉ.सुहास जगताप,आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची नेमणुक करण्यात येते. यांना श्री.प्रशांत शहापुरकर, कनिष्ठ लिपीक व श्री.सोहेल अहेमद खान,कनिष्ठ लिपीक हे मदत करतील. ज्यांना प्रस्तावाच्या बाजुने मत नोंदवायचे असेल त्यांनी माझ्या उजव्या बाजुला “होय” या ठिकाणी व ज्यांना प्रस्तावाच्या विरोधात मत नोंदवायचे असेल त्यांनी माझ्या डाव्या बाजुला “नाही” या फलकाच्या ठिकाणी ठेवलेल्या पालिका सदस्यांच्या यादीतील आपल्या नावासमोर गणकासमक्ष आद्याक्षरी करावी.

या प्रस्तावाच्या बाजुने मत नोंदविलेल्या “होय”असलेल्या सदस्यांची नावे-

| स. पालिका सदस्यांची नांवे |
|---|
| १.श्री. बमणे पुनमचंद सोनाजी |
| २.श्री. जाधव बन्सी ग्यानू |
| ३.श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ४.श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ५.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ६.सौ. रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ७.श्री.विजय साईनाथ औताडे |
| ८.श्री. सुरे सीताराम इसराम |

इति.स.सा.सभा दिनांक २०.१०.२०१५
कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०८

| |
|---|
| ९.सौ. स्वाती किशोर नागरे |
| १०.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल |
| ११.श्री. शेजवळ सुभाष सयाजी |
| १२.श्री. रावसाहेब राधाकिसन आमले |
| १३.श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १४.श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १५.श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| १६.श्री. सय्यद मतीन रशीद |
| १७.श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन |
| १८.श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| १९.श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २०.श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २१.श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २२.श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २३.श्री. खान जहाँगीर मुलानी |
| २४.श्रीमती खरात सिमा गणपत |
| २५.सौ. शोभा नारायणराव वळसे |
| २६.श्री. चित्ते नितीन रमन |
| २७.सौ. ज्योती सुभाष पिंजरकर |
| २८.श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २९.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३०.श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३१.श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३२.श्री.शिंदे राजु रामराव |
| ३३.श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३४.श्री. मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३५.श्री. खान इरशाद इब्राहिम |
| ३६.श्रीमती नसीम बी सांडु खाँ |
| ३७.श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३८.श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ३९.श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४०.श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ४१.कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४२.श्री. तनवाणी राजु लेखराज |
| ४३.श्री.ढगे गंगाधर नामदेव |

| |
|---|
| ४४.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान |
| ४५.श्री. एडके विकास प्रकाश |
| ४६.श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४७.श्री. भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४८.श्री. बल्लाळ मनोज आसाराम |
| ४९.श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५०.श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५१.श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५२.श्री. शेख जफर अखतर |
| ५३.श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जलानी |
| ५४.श्रीमती गादगे शितल विरभद्र |
| ५५.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५६.श्री. दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५७.श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५८.श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५९.श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ६०.श्री. खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६१.श्री. बारवाल गजानन रामकिसन |
| ६२.श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६३.श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६४.श्रीमती बनकर विजया संजय |
| ६५.श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६६.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६७.श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६८.श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६९.श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ७०.श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७१.श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे |
| ७२.श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ७३.श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७४.श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ७५.श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७६.श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७७.श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७८.श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड |

| |
|---|
| ७९.श्रीमती मिना रामदास गायके |
| ८०.श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ८१.श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ८२.श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८३.श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८४.श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८५.श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८६.श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८७.श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८८.श्री.विकास रतनलाल जैन |
| ८९.श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ९०.श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ९१.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ९२.श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ९३.श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९४.श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९५.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

या प्रस्तावाच्या विरोधात मत नोंदविलेल्या “नाही” असलेल्या सदस्यांची नावे-

| स. पालिका सदस्यांची नांवे |
|---|
| १.श्री. खान अय्युब म.हुसेन खान |
| २.श्री. अफसर खॉन यासीन खॉ |
| ३.श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ४.श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ५.श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ६.श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ७.श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ८.श्री. जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ९.श्री.सोहेल शकील शेख |
| १०.श्रीमती साळवे अनिता मोहन |
| ११.श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| १२.श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| १३.श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |

मा.महापौर :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३६ (३) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या सभेत एकुण पालिका सदस्यांपैकी पाच अष्टमांश सदस्यांनी आयुक्तांना पदावरून काढून टाकण्याविषयीच्या ठरावाच्या बाजूने होय मत दिले तर राज्य शासनाने त्यांना ताबडतोब पदावरून काढून टाकले पाहिजे. १२ सदस्यांच्या लेखी मागणीवरुन आजच्या सभेत विषय क्रमांक-२१८ वर मतदान घेण्यात आले असून ठरावाच्या बाजुने व ठरावाच्या विरोधात झालेले मतदान असे आहे. ठरावाच्या बाजुने म्हणजे होय ९५ मते व ठरावाच्या विरोधात म्हणजे नाही १३ मते एकुण सदस्य संख्या ११३ उपस्थित सदस्य १०८. मा.आयुक्तांना शासनाकडे परत पाठविण्याबाबतचा दिनांक १०.०९.२०१५ रोजी एमआयएमच्या सदस्यांनी ठराव यासभेसाठी दिला होता. या ठरावाचे सुचक व अनुमोदक यात समावेश करावे. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे विद्यमान मा.आयुक्त हे महापालिकेचे कामकाज हाताळण्यासाठी असमर्थ ठरलेले आहेत. अशी सदस्यांची भावना आहे. त्यांची लोकप्रतिनीधी आणि अधिकारी यांच्या संदर्भात योग्य वर्तणुक नसल्याचे स.सदस्यांचे म्हणणे आहे. असे दिसून येते की ते नेहमी कार्यालयात गैरहजर राहतात. त्यामुळे महापालिकेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होतो. असे सभागृहाचे मत झाले आहे. महापालिकेच्या आर्थिक बाबींवर त्यांचे नियंत्रण नाही. इत्यादी बाबींमुळे त्यांनी आपले कर्तव्य बजावण्यात कसूर केल्याचे निष्पन्न होत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३६(३)च्या तरतुदीला अनुसरून मा.आयुक्त यांना शासनाकडे परत पाठविण्याच्या ठरावास ५/८ पेक्षा जास्त मतांनी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. तसेच हा ठराव पुढील कार्यवाहीसाठी महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त यांनी शासनाकडे पाठवावा. शासनाकडून नियमीत आयुक्ताची नेमणुक होईपर्यंत अतिरीक्त आयुक्तांनी कारभार सांभाळावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या मतदान व झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावातील नमुद सर्व बाबींवरुन मा.आयुक्तांनी त्यांच्या कर्तव्याचे पालन करण्यास कसुर केलेली असल्याचे स्पष्टपणे निदर्शनास आलेले असल्याने विद्यमान मा.आयुक्त हे महानगरपालिकेचे कामकाज हाताळण्यासाठी असमर्थ ठरलेले आहेत. त्यांची लोकप्रतिनीधी आणि अधिकारी यांच्या संदर्भात योग्य वर्तणुक नसल्याने तसेच ते नेहमी कार्यालयात गैरहजर राहतात. त्यामुळे महापालिकेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होतो. महापालिकेच्या आर्थिक बाबींवर त्यांचे नियंत्रण नाही. इत्यादी आणि प्रस्तावात नमुद बाबींमुळे त्यांनी आपले कर्तव्य बजावण्यास कसूर केल्याचे दिसून येते. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३६(३)च्या तरतुदीला अनुसरून मा.आयुक्त यांना सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व प्रस्तावावर झालेल्या मतदानानुसार

सभागृहात एकुण निर्वाचित पालिका सदस्य संख्या ११३ पैकी उपस्थित १०८ पालिका सदस्यांपैकी प्रस्तावाच्या बाजूने ९५ तर प्रस्तावाच्या विरोधात १३ मते पडल्याने मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना शासनाकडे परत पाठविण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. तसेच यापुर्वी असाच प्रस्ताव सादर झाला होता. त्यातील सर्व सुचक व अनुमोदक असलेले स.पालिका सदस्य श्री.अजीम अहेमद रफीक,श्री.जहांगीर खान, श्री.खान इरशाद इब्राहीम,श्री.नासेर सिद्दीकी,श्रीमती सरिता अरुण बोर्डे,श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम,श्री.फेरोज खान, श्रीमती साजेदा फारूकी,श्रीमती शेख समिना इलियास,श्री.जमीर कादरी,श्री.गंगाधर ढगे,श्रीमती नसरीन बेगम रफत यार खान, श्री.सय्यद मतीन, श्रीमती सायरा बानो अजमल खान,श्री.मोहम्मद अय्युब जहागीरदार,श्रीमती संगिता सुभाष वाघुले,श्री.विकास प्रकाश एडके यांचे या प्रस्तावास सुचक/अनुमोदक म्हणुन दुरूस्ती करण्यास आणि महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त/प्रशासनाने हा ठराव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच सभा तहकुब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.